॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

✻ सुविचार ✻

प्रश्न विचारणे ही ज्ञानाच्या शोधाची पहिली पायरी आहे.




■ अहिल्यानगर ■ सोमवार, दि. १६ जून २०२५ ■ वर्ष ६ वे ■ अंक ६१ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145

## SPOT NEWS

### अमरनाथ यात्रेसाठी यंदा कडक सुरक्षा व्यवस्था

● **नवी दिल्ली** – अमरनाथ यात्रामार्गावर यंदा सुरक्षा बंदोबस्त प्रचंड वाढवण्यात आला आहे. 'ऑपरेशन सिंदूर'च्या पार्श्वभूमीवर संभाव्य हल्ल्यांचा धोका लक्षात घेता जम्मू-काश्मीर पोलिस, लष्कर, केंद्रीय राखीव पोलिस दलासह निमलष्करी दलाचे जवानही तैनात करण्यात आले आहेत. पवित्र अमरनाथ गुहेत दर्शन घेण्यासाठी यंदा यात्रेकरूंची गर्दी होण्याची शक्यता पाहता हा बंदोबस्त करण्यात आला आहे. या देवस्थानात जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांच्या हस्ते पहिली पूजा करण्यात आली असून, बाबा बर्फानींच्या दर्शनासाठी औपचारिकदृष्ट्या यात्रा प्रारंभ झाली आहे. प्रत्यक्ष यात्रा ३ जुलै ते ९ ऑगस्टपर्यंत चालेल. यंदा अमरनाथ यात्रा ५२ दिवसांऐवजी ३८ दिवसांची असणार आहे. यंदाची सुरक्षा व्यवस्था पाहता यात्रेकरूंनी फार चिंता करण्याची गरज नाही, असे सिन्हा यांनी म्हटले. मात्र, अधिकाऱ्यांच्या मते यंदा या यात्रेत सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. पाकिस्तानी 'आयएसआय'चे हस्तक या यात्रेत यंदा कारवाया करू शकतात. त्यामुळे सुरक्षा व्यवस्था वाढवली आहे. परंपरागत पहलगामच्या चंदनबाडीहून एक मार्ग असून, दुसरा मार्ग बालाटालमार्गे आहे. जुना मार्ग थोडा लांबचा आहे. पहलगामपासून गुहेपर्यंतचा मार्ग ४८ किमी तर बालाटाल मार्ग १४ किमीचा आहे. दोन्ही मार्गांवर सुरक्षाविषयक ऑडिट केले आहे.

### 'कांतारा चॅप्टर १' च्या चित्रिकरण; बोट उलटून ३० बुडाले

● **मुंबई** – 'कांतारा चॅप्टर १' या चित्रपटाचे शूटींग कर्नाटकातील शिवमोगा जिल्ह्यात सुरु असून. मस्ती कट्टे भागात असलेल्या मणी जलाशयात बोअ उलटून ३० क्रु मेम्बर्स बुडाल्याची दुर्दैवी घटना रविवारी दुपारी घडली आहे. कांतारा चित्रपटाला मोठे यश मिळाल्यानंतर चित्रपटाचे दिग्दर्शक ऋषभ शेट्टी हे दुसरा भाग बनवत आहेत. मात्र मे महिन्यापासून शूटिंगदरम्यान अनेक अनुचित घटना घडत आहेत. आता बोट उलटून झालेल्या अपघातात कोणीही जखमी झालेले नाही, मात्र या घटनेत अनेक महागडे कॅमेरे आणि इतर उपकरणे पाण्यात बुडाली असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

# इंद्रायणी नदीवरील कुंडमळा पूल कोसळला

## अनेक पर्यटक वाहून गेल्याची भीती । चार जणांचे मृतदेह सापडले

● **पुणे । वीरभूमी–**

पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात रविवारी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास इंद्रायणी नदीवर कुंडमळा परिसरात एक धक्कादायक घटना घडली. मुसळधार पावसामुळे पाण्याने खचलेल्या जुन्या पुलाचा एक भाग कोसळला असून, यामध्ये मोठ्या प्रमाणात पर्यटक वाहून गेल्याची भीती व्यक्त केली जात आहे. सुमारे ३० ते ४० जण नदीच्या प्रवाहात अडकले किंवा वाहून गेले असावेत, अशी प्राथमिक माहिती आहे. रात्री उशिरा चार मृतदेह सापडल्याचे अधिकृत सूत्रांनी सांगितले आहे.

गेल्या दोन दिवसांपासून मावळ परिसरात पावसाचा जोर कायम असून इंद्रायणी नदीला पूर आला आहे. त्यामुळे बचाव कार्य अधिक अवघड झाले आहे. एनडीआरएफ, पोलीस व अग्निशमन दलाच्या पथकांकडून रात्रीपासून शर्थीचे बचावकार्य सुरू आहे. नदीच्या दोन्ही किनाऱ्यावर शोधमोहीम राबवली जात आहे.

राज्याचे जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दुर्घटनास्थळी भेट देऊन



परिस्थितीचा आढावा घेतला. या दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांना राज्य सरकारकडून प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार असून, जखमींच्या उपचारांचा सर्व खर्च शासन उचलणार आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

पुलावर सेल्फी घेण्यासाठी पर्यटकांनी मोठी गर्दी केली होती आणि त्यामुळेच पुलावर अतिरिक्त ताण पडला, अशी माहितीही त्यांनी दिली. पर्यटकांनी आपल्या सुरक्षिततेची जबाबदारी घ्यावी. केवळ सोशल मीडियासाठी जीव धोक्यात घालणे धोकादायक आहे, असा इशारा गिरीश महाजन यांनी दिला.

संपूर्ण राज्यभरातून या दुर्घटनेबाबत तीव्र हळहळ व्यक्त केली जात असून, पूरस्थितीत अशा धोकादायक भागांपासून दूर राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

पुणे जिल्ह्यातील तळेगावनजीक इंदोरी येथे इंद्रायणी नदीवरील एक पूल कोसळून झालेल्या दुर्घटनेचे वृत्त ऐकुन अतिशय दुःख झाले. या घटनेत प्राथमिक माहितीनुसार २ लोकांचा मृत्यू झाला आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, आतापर्यंत ६ जणांना आतापर्यंत वाचविण्यात यश आले आहे. सर्व यंत्रणांना अलर्ट मोडवर ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ३२ लोक जखमी झाले, त्यापैकी ६ गंभीर आहेत. त्यांना उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. स्वतः विभागीय आयुक्त घटनास्थळाकडे रवाना झाले आहेत.

## विश्वगंगा नदीत ८ भाविक बुडाले

● **बुलढाणा । वीरभूमी–**

नांदुरा तालुक्यातील निंबोळा देवी संस्थान येथे दर्शनाकरिता गेलेल्या आठपैकी दोन भाविकांचा नदीपात्रात बुडून मृत्यू झाला. मृतांमध्ये मायलेकीचा समावेश आहे. खामगाव परिसरातील सुटाळपुरा येथील ८ भाविक नांदुरा तालुक्यातील नींबोळा देवी संस्थान येथे आले होते. यामध्ये दोन पुरुष आणि सहा महिलांचा समावेश होता.

विश्वगंगा नदीच्या काठी पूजेपूर्वी स्नान करण्यासाठी आठही भाविक नदीत उतरले. मे महिन्यात झालेल्या मुसळधार पावसाने आणि जून महिन्यात मागील तीन-चार दिवसांत झालेल्या जोरदार पावसामुळे नदीपात्रात भरपूर पाणी आहे. या ८ भाविकांपैकी दोघींना नदीतील खोल पाण्याचा अंदाज आला नाही. तसेच पोहणे येत नसल्याने त्या मायलेकी खोल पाण्यात बुडाल्या. सोबतच्या भाविकांनी त्यांना बचावण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यात अपयश आले. पूनम मयूर जामोदे (३२) व आर्वी मयूर जामोदे (५), अशी मृत मायलेकीची नावे आहेत.

उर्वरित सहा भाविक सुखरूप बचावले आहेत. त्यांच्यावर बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर येथील उपजिल्हा सामान्य रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आल्याचे समजते. याप्रकरणी नांदुरा पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. या घटनेमुळे देवी संस्थान परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची वार्ता येऊन धडकताच खामगाव सुटाळा परिसरात व जामोदे कुटुंबात एकच आकांत उसळला. नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेतली. नांदुरा पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविले.

## केदारनाथमध्ये हेलिकॉप्टरचा अपघात; ७ ठार

● **डेहराडून । वीरभूमी–**

उत्तराखंडच्या केदारनाथ धाममध्ये पुन्हा एकदा मोठी दुर्घटना घडली आहे. रविवारी केदारनाथ मार्गावर एक हेलिकॉप्टर कोसळले. हेलिकॉप्टरमध्ये पायलटसह एकूण ७ जण असल्याची माहिती समोर येत आहे. या अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आर्यन कंपनीचे हेलिकॉप्टर दुर्घटनाग्रस्त झाले. ही दुर्घटना गौरीकुंड आणि त्रिजुगीनारायणदरम्यान घडली. हेलिकॉप्टर क्रॅश होण्याचे कारण खराब हवामान असल्याचे सांगितले जात आहे.



चारधाम यात्रेदरम्यान वेगवेगळ्या धामांवर हेलिकॉप्टर अनेक वेळा क्रॅश झाले आहेत. तसेच हेलिकॉप्टरचे अनेक वेळा आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. अलीकडेच रस्त्याच्या मधोमध हेलिकॉप्टरचे लँडिंग करण्यात आले. चारधाम यात्रेच्या सुरुवातीला एक हेलिकॉप्टर क्रॅश झाले, ज्यामध्ये अनेक लोकांचा मृत्यू झाला.

हेलिकॉप्टरमध्ये एका लहान मुलासह ७ जणांचा मृत्यू झाला आहे. प्रवासी हे उत्तराखंड, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात राज्यातील होते. मृतांमध्ये महाराष्ट्रातील ३५ वर्षीय श्रद्धा राजकुमार जैसवाल आणि ४१ वर्षीय राजकुमार सुरेश जैसवाल यांच्यासह दोन वर्षीय काशी या मुलीचा समावेश आहे. तर विक्रम (उत्तराखंड), विनोद देवी (६६, उत्तर प्रदेश), तुस्थी सिंग (१९, उत्तर प्रदेश), कॅप. राजीवसिंग चौहान (पायलट) यांचाही समावेश आहे.

# महिला सुरक्षितता, सशक्तीकरण, उन्नतीसाठी राज्य शासन वचनबद्ध

## उपमुख्यमंत्री अजित पवार । बारामती तालुक्यातील स्वयंसहाय्यता समूहांना कर्ज धनादेश प्रदान

● **बारामती । वीरभूमी–**

महाराष्ट्राने महिला सक्षमीकरण आणि सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रात नेहमीच पुढाकार घेतला आहे. राज्य नेहमीच महिलांच्या सक्षमीकरणाकरिता प्रयत्नशील असून त्यांच्या सुरक्षितता, सशक्तीकरण, उन्नतीसाठी राज्यशासन वचनबद्ध आहे. महिलांचे सन्मान आणि प्रगती ही सामाजिक जबाबदारी असण्यासोबतच महाराष्ट्राचा समृद्ध भविष्याचा पाया आहे, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद), जिल्हा परिषद आणि पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने स्वयंसहाय्यता समूहांना कर्ज धनादेश प्रदान कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी गट विकास अधिकारी डॉ.अनिल बागल, सहायक गट विकास अधिकारी नंदन जंराडे, बाल विकास प्रकल्प अधिकारी अभिमान माने, गट शिक्षणाधिकारी निलेश गवळी, बांधकाम विभागाचे उप अभियंता शिवकुमार कुपल, माजी नगराध्यक्ष सुभाष सोमाणी आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, यावर्षी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिजन्मशताब्दीवर्ष, कोल्हापूर करवीर संस्थानच्या संस्थापक छत्रपती रणरागिणी महाराणी ताराबाई ३५० वा त्रिशतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंती वर्ष असून यानिमित्ताने राज्य शासनाच्यावतीने वर्षभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. स्वराज्यजननी राजमाता जिजाऊमाँसाहेब, छत्रपती महाराणी ताराबाई, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले,पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या महाराष्ट्राच्या इतिहासाचा गौरवशाली अध्याय असून हा गौरव जपण्यासोबतच वाढविण्याचे काम करावे. महाराष्ट्राच्या मातीला राजमाता जिजाऊमाँसाहेब, छत्रपती महाराणी ताराबाई, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा वारसा असून त्यांनी कृतीतून दिलेल्या वाटेवरच वाटचाल करायची आहे, त्यांच्या कार्याचा वारसा जपत पुढे नेण्यासाठी पुढाकार घ्यावा.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे अलौकिक असून त्या सर्वोत्कृष्ट राज्यकर्त्या, शासक होत्या, त्यांच्या अंगी प्रजेच्या कल्याणाप्रती असलेली तळमळ ही त्यांच्या कार्यातून दिसून येते. त्यांनी देशात सुंदर मंदिरे उभी करण्यासोबतच विविध नद्यांच्याकडेला घाट, धर्मशाळा, गावोगावी रस्त्याचे बांधकाम, पाणपोई उभारणीचे काम केले असून असे लोककल्याणकारी कार्य त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष देत आहेत. त्यामुळे शेकडो वर्षांपूर्वी बांधलेले बारव, घाट नादुरुस्त झालेले असल्यास त्याची दुरुस्ती करण्याचे काम राज्यशासनाने हाती घेतले आहे.

देशाला आत्मनिर्भर करतांना महिला आत्मनिर्भर झाल्या पाहिजे, याकरीता राज्य शासनाने महिलांच्या सक्षमीकरणाकरीता विविध लोककल्याणकारी, क्रांतिकारी निर्णय, उपक्रम हाती घेण्यात आले असून त्यामध्ये स्वतंत्र महिला धोरण, वडिलोपार्जित संपत्तीत समान हक्क, शासकीय सेवेत ३३ टक्के राखीव जागा, स्थानिक



स्वराज्य संस्थेत ५० टक्के आरक्षण, एसटी बस भाड्यात ५० टक्के सवलत, मुलींना मोफत शिक्षणदेण्यासोबतच उच्च व तांत्रिक शिक्षण मोफत यांच्यासह राज्यात ७ लाख नवीन बचतगटांची स्थापना करण्यासोबतच बचत गटांच्या फिरत्या निधीच्या रकमेत ३० हजार रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या वर्षी बारामती तालुक्यातील बचत गटांना सुमारे ३ कोटी १५ लाख रुपयांचे वाटप करण्यात आले असून १ कोटीहून अधिक रुपयांच्या कर्ज मंजूरी आदेश वाटप करण्यात येत आहे, ही रक्कम नसून नव्या प्रवाशाची सुरुवात आहे, घराघरामध्ये नवीन उद्योग उभारण्यास हातभार लागणार आहे. या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांच्या स्वप्नांना आणि पंखांना बळ मिळणार असून पाल्यांना शिक्षण, कुटुंबाला स्थर्य पर्यायाने गावाची समृद्धी होण्यास मदत होणार आहे, असेही उपमुख्यमंत्री पवार म्हणाले. डॉ. बागल यांनी प्रास्ताविक केले.

## SPOT NEWS

### कोकणगाव मधील अपघातग्रस्तांना माजी मंत्री थोरात यांच्या यंत्रणेतून तातडीने मदत

**● संगमनेर । प्रतिनिधी–**

कोल्हार घोटी राज्यमार्गावर कोकणगाव परिसरामध्ये सकाळी सातच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातामध्ये ३ जणांचा जागीच मृत्यू झाला असून सातजण जखमी झाले आहेत. अपघातानंतर महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी आपल्या कार्यकर्त्यांना तातडीच्या मदतीच्या सूचना दिले असून यशोधन यंत्रणेच्या मार्फत जखमींना मदत करण्यात आली आहे. याबाबत माहिती अशी की आज सकाळी कोकणगाव शिवारामध्ये ट्रॅव्हल्स व आंब्याने भरलेल्या ट्रकची जोरदार धडक झाली यामध्ये संगमनेर तालुक्यातील सुकेवाडी येथील सोपान कांदळकर, फिरोज लाला शेख, व अंजू वाल्मिकी यांचा मृत्यू झाला आहे तर सात जण गंभीर जखमी झाले आहेत. कार्यकर्त्यांनी मार्फत झालेल्या घटनेची माहिती मिळतात महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी या परिसरातील आपल्या सर्व कार्यकर्त्यांना तातडीने घटनास्थळाला भेट देऊन अपघात रस्त्यांना मदत करावी अशा सूचना दिल्या. याचबरोबर इंद्रजीत भाऊ थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली यशोधन यंत्रणेच्या माध्यमातून जखमीच्या उपचारार्थ मदत कार्य करण्यात आले असून त्यांना संगमनेर मधील कुटे हॉस्पिटल येथे ॲडमिट करण्यात आले आहे. त्यांच्यावर उपचार सुरू आहे. अपघातग्रस्तांना जास्तीत जास्त मदत म्हणून देण्याबरोबर जखमींना चांगले उपचार देण्यासाठी यशोधन कार्यालयातील कर्मचारी मदत करत आहेत.

### एकलव्य तायक्कांदोच्या तीन खेळाडूचा सहभाग

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

इंडिया तायक्कांदोच्यावतीने ओपन सिलेक्शन ट्रायल्स ९ ते ११ जून २०२५ रोजी विभागीय क्रीडा संकुल पंचवटी नाशिक या ठिकाणी घेण्यात आली.या स्पर्धेमध्ये एकलव्य तायक्कांदो अकॅडमीच्या वतीने ३ खेळाडूंनी सहभाग नोंदवाला. ७३ किलो वजन गटात सुवर्णपदकाचा मानकरी ठरला थानोजसाई रेड्डी किसरा तर, ४८ किलो वजन गटात विराज पिसाळ कांस्यपदकाचा मानकरी ठरला. ४९ किलो वजन गटात वनश्री लष्करे यांनी आपला सहभाग नोंदवला. या तीन खेळाडूंनी उत्तम खेळाचे प्रदर्शन करत यश संपादन केले. थानोजसाई रेड्डी व विराज पिसाळ यांची एशियन युथ गेम साठी होणाऱ्या कॅम्पसाठी निवड झाली आहे. सदर कॅम्प स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडिया च्या वतीने घेण्यात येणार आहे. या स्पर्धेमध्ये संपूर्ण भारतातून तायक्कांदोचे नामवंत खेळाडू सहभागी झाले होते. अहिल्यानगरचे एकलव्य तायक्कांदो अकॅडमीच्या खेळाडूंनी सर्वांना आसमान दाखवत आपलं वर्चस्व कायम ठेवलं या खेळाडूंना मुख्य प्रशिक्षक– गणेश वंजारे, योगेश बिचीतकर, सचिन मरकड, मंगेश आहेर, व ग्रँड मास्टर अल्ताफ खान सर यांचे मार्गदर्शन लाभले. विजयी खेळाडूंचा इंडिया तायक्कांदोचे अध्यक्ष नामदेव शिरगावकर सर व महाराष्ट्र तायक्कांदो असोसिएशनचे सचिव गफार पठाण सर, एडवोकेट गजेंद्र पिसाळ, प्राध्यापक– बालीरेड्डी, किसरा तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष–संदीप ओंबसे, खजिनदार– प्रसाद कुलकर्णी सर,यांनी अभिनंदन केले. व येणाऱ्या एशियन युथ गेम्स साठी शुभेच्छा दिल्या. तायक्कांदो स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष–प्राध्यापक माणिकराव विधाते, तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे उपाध्यक्ष –घनश्याम सानप सर, एकलव्य एकलव्य अकॅडमीचे अध्यक्ष– दिलीपदादा सातपुते, यांनी खेळाडूंची अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा

## आयुक्त यशवंत डांगे यांचे नागरिकांना आवाहन । डेंग्यूमुक्त अहिल्यानगर अभियान सुरू

**● अ. नगर । वीरभूमी –**

महानगरपालिकेच्या वतीने अहिल्यानगर शहर डेंग्यूमुक्त करण्यासाठी उपाययोजना सुरू आहेत. त्याचाच भाग म्हणून नागरिकांच्या सहभागातून डेंगू मुक्त अहिल्यानगर अभियान दर रविवारी राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आरोग्य विभागाची पथके दर आठवड्याला १००० घरांना भेटी देऊन सर्वेक्षण व उपायोजना करणार आहेत. रविवार पासून या अभियानाला सुरुवात झाली आहे. डास आळींची उत्पत्ती रोखली जावी, यासाठी आठवड्यातून एक दिवस नागरिकांनी कोरडा दिवस पाळावा व या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.



मागील वर्षे ही महानगरपालिकेच्या वतीने डेंगू मुक्त शहर अभियान राबवले होते. यात नागरिक व विविध संघटनेचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. यावर्षी होणाऱ्या अभियानात आरोग्य विभागाचे १२ वैद्यकीय अधिकारी, १ साथरोग अधिकारी, १५ स्टाफ नर्स, ३५ एएनएम, ६ एमपीडब्ल्यू, १६ मलेरिया कर्मचारी, २५ आशा स्वयंसेविका असे ११० कर्मचारी अभियानाच्या माध्यमातून २० पथकांद्वारे १००० घरांतील ५००० लोकसंख्येचे सर्वेक्षण करणार आहेत. रविवार १५ जून पासून हे अभियान सुरू करण्यात आले आहे.

डेंग्यू पासून सावध राहण्यासाठी, डेंग्यूची डास अळीची उत्पत्ती रोखण्यासाठी जनजागृती करणे, डास अळी नियंत्रण कार्यक्रम, पाणीसाठ्यांची तपासणी, पाणी साठवले जाणारे अथवा दूषित पाणी साठलेले कंटेनर शोधून रिकामी करणे, पाण्यात अळीनाशक ॲबेट टाकणे, डास नाशक स्प्रेईंग करणे, डास अळी सापडलेल्या घरांवर स्टिकर लावणे, ताप सदृश्य रुग्णांचे सर्व्हेक्षण, मलेरिया स्लाईड घेणे, कार्यक्षेत्रात आरोग्य शिक्षण देणे, डास उत्पत्ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, नागरिकांमध्ये जनजागृतीकरिता माहितीपत्रके वाटप करणे आदी कार्यक्रम व उपक्रम या अभियानातून होणार आहेत. नागरिकांनीही या अभियानात सहभागी व्हावे. एक दिवस कोरडा दिवस पाळावा व स्वतःच्या घराची तपासणी करून साचालेले पाणी काढून टाकावे, असे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी म्हटले आहे.

## दिव्यांग व्यक्ती हा समाजातील एक संघर्षशील घटक

### ॲड. जाधव । अनाम प्रेमच्या विद्यार्थ्यांना साहित्य वाटप

**● अ. नगर । प्रतिनिधी–**

दिव्यांग व्यक्ती हा समाजातील एक संघर्षशील घटक आहे. आपल्या जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर ते अनेक वेळा अशक्य वाटणाऱ्या उंची गाठतात. त्यांच्या प्रगतीसाठी आपण सर्वांनी एक पाऊल पुढे टाकले पाहिजे, अशा भावनिक आणि प्रेरणादायी भावना ॲड. धनंजय जाधव यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त व्यक्त केल्या.

जंगूभाई तालीम ट्रस्टच्या वतीने आयोजित या विशेष उपक्रमात, अनाम प्रेम संस्था येथील दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. हा उपक्रम सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेऊन करण्यात आला असून, उत्सव, वाढदिवस अशा प्रसंगी समाजोपयोगी कार्य घडावे हीच आपली खरी संस्कृती असल्याचे प्रतिपादन ॲड. जाधव यांनी यावेळी केले.

या उपक्रमात शालेय साहित्याचे वाटप मितेश शहा, तेजस कथडे, पवन गुंदेचा, सचिन डुंगरवाल, विश्वजीत बोरा यांच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी रोहन सानप, सिद्धार्थ मुथियान, राहुल मुथा, आदिनाथ जाधव, सोमनाथ जाधव, योगेश साबळे, प्रशांत दारकुंडे, साहिल ओस्तवाल, धनेश खत्ती, शिवदत्त पांढरे, पुरुषोत्तम सब्बन, ज्ञानेश्वर दौंडकर, स्वप्निल अंकम, राहुल गोंधळे आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, समाजामध्ये वावरताना आपण समाजाची काही देणे लागतो या भावनेतून प्रत्येकाने काही ना काही समाजोपयोगी कार्य केले पाहिजे. केवळ स्वतःच्या आनंदासाठी नाही, तर दुसऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू आणण्यासाठी आपण सण–उत्सव व वाढदिवस साजरे करावेत. सदर उपक्रमाच्या माध्यमातून समाजात सकारात्मकतेचा संदेश पोहोचवण्याचा आणि दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास जागवण्याचा प्रयत्न करण्यात आला. उपस्थित सर्वांनी या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले आणि ॲड. जाधव यांच्या सामाजिक जाणिवेचे अभिनंदन केले.

## केडगाव येथील ज्ञानसाधना संस्थेच्यावतीने दहावी बोर्डातील गुणवंतांचा सन्मान

**● अ. नगर । वीरभूमी–**

ज्ञानसाधना बहुउद्देशीय व सेवाभावी संस्था केडगाव संचलित ज्ञानसाधना गुरुकुल व लंडन किड्स प्री स्कूलच्या वतीने इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. ज्ञानसाधना गुरुकुलमध्ये शिकत असलेली. कु. वैष्णवी औशीकर ९७% गुण मिळवून प्रथम आली. रेवती साबळे ९५% गुण मिळवून द्वितीय तर सिद्धनीता डंबाळे ९३% गुण मिळवून तृतीय आली. तिन्ही गुणवंत विद्यार्थ्यांना अनुक्रमे संगणक, सायकल व शैक्षणिक साहित्याचे बक्षिस देऊन इतर तब्बल ५० हून अधिक विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.



गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा पत्रकार विठ्ठल लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. लांडगे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे जिद्दीने अभ्यास केला, तर त्यांना यश नक्कीच मिळणार. फक्त चांगले टक्केवारी पडले म्हणजे विद्यार्थी यशस्वी झाला असे नाही. त्यांच्या मध्ये संस्कार असणे आवश्यक आहे. रोज सकाळी शाळेत जातांना आई–वडिलांच्या पाया पडूनच निघाले पाहिजे. तुमचे आई–वडील तुमचे दैवत आहेत. त्याच देवाकडे तुम्ही दुर्लक्ष करता, हे योग्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शाळेतच संस्काराची रुजवण करणे काळाची गरज झाली आहे. मुलांचे पालक रिल्स बनवण्यात मग्न असतील तर हे पालकांचे अपयश म्हणावे लागेल. मुलांमधील गुण ओळखण्यासाठी त्यांच्याशी संवाद महत्त्वाचा ठरणार असल्याचेही ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माजी सभापती मनोज कोतकर म्हणाले की, ज्ञानसाधना या छोट्याश्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर झाले असून, या वटवृक्षाखाली अनेक गुणवंत विद्यार्थी घडत आहे. फक्त शिक्षण नव्हे, तर संस्कार देखील रुजवण्याचे कार्य ज्ञानसाधना परिवार करत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी संभाजी पवार, जालिंदर कोतकर, छबुराव कोतकर, मुख्याध्यापक संदीप भोर, अजित कोतकर, नवनाथ कोतकर, गोरख कोतकर, विक्रम लोखंडे, ज्ञानसाधना गुरुकुलचे संचालक प्रसाद जमदाडे, गिरीश पटवा, अनिकेत शियाळ, कुणाल चिपाडे, रवींद्र पंडित, अमित ढोरसकर, दत्तात्रय चेमटे, स्वप्नील परांडे, शाहरुख शेख, प्राचार्या रुचिता जमदाडे, शबाना शेख, प्रतीक्षा फुलारी, जोसना सातपुते, सुवर्णा दाणी, सुप्रिया मुळे, कल्याणी शिंदे, सपना साबळे, प्रतिभा साबळे, जयश्री साठे आदी शिक्षकांसह विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक अनुष्का राऊत यांनी केले. सूत्रसंचालन दिव्या रोकडे व श्रावणी कोळी यांनी केले. आभार आदिती कोठावळे हिने मानले.

# अखेर एमआयडीसीचे रेणुका माता देवस्थान जुन्या ट्रस्टच्याच ताब्यात

## उच्च न्यायालयाचे आदेश । मंदिर परिसरात ट्रस्टचे पदाधिकारी व विश्वस्तांचा पेढे वाटून आनंदोत्सव साजरा

**● अ. नगर । वीरभूमी –**

नागापूर, एमआयडीसी येथील रेणुका माता देवस्थानचे जुन्या ट्रस्टला धर्मदात आयुक्त पुणे यांनी दिलेल्या मान्यतेनंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने देखील जुन्या ट्रस्टला मान्यता दिल्याचा आदेश दिला आहे. या निकालानंतर मंदिरात रेणुका माता देवीची आरती करुन मंदिर परिसरात ट्रस्टचे पदाधिकारी व विश्वस्तांनी जल्लोष केला.

प्रारंभी ट्रस्टच्या पदाधिकारी व विश्वस्तांच्या हस्ते आरती करण्यात आली. एकमेकांना पेढे भरवून फटाक्यांची आतषबाजीत जल्लोष करण्यात आला. यावेळी अधिकृत ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर भोर, उपाध्यक्ष साहेबराव भोर, सचिव दत्तात्रय विटेकर, खजिनदार एकनाथ वाघ, विश्वस्त गोरख कातोरे, राजू भोर, विष्णू भोर, किरण सप्रे, गणेश कातोरे, महेश सप्रे, सचिन कोतकर यांच्यासह ह.भ.प. राधाकिसन कातोरे, गंगाधर वाकळे, नगरसेवक दत्तापाटील सप्रे, नवनागापूर सदस्य नाना दांगट, ज्ञानदेव सप्रे आदींसह भाविक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नागापूर, एमआयडीसी येथील रेणुका माता देवस्थानची सन २००२ मध्ये ट्रस्ट स्थापन करण्यात आली. या ट्रस्टमधील काही संचालकांनी बंडखोरी करून, २०१९ साली नवीन ट्रस्टची स्थापना केली होती. जुने ट्रस्ट विरोधात नवीन ट्रस्टचा वाद निर्माण झाला होता. याप्रकरणी धर्मदाय आयुक्तांकडे अध्यक्ष प्रभाकर भोर व सचिव दत्तात्रय विटेकर यांनी दावा दाखल केला होता. याप्रकरणी अंतिम सुनावणीसाठी प्रकरण पुणे धर्मदाय आयुक्तांकडे पाठविण्यात आले. याप्रकरणी तीन वर्षे सुनावणी होऊन २४ मार्च २०२३ रोजी पुणे धर्मदाय आयुक्तांनी मंदिराचे जुने ट्रस्टला मान्यता देऊन नव्याने स्थापन झालेल्या ट्रस्टची मान्यता नाकारली होती.

या निकालानंतर नवीन ट्रस्टच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठात अपील करण्यात आले होते. या प्रकरणात देखील अध्यक्ष प्रभाकर भोर व सचिव दत्तात्रय विटेकर यांनी ट्रस्टच्या वतीने न्यायलयीन लढा दिला. न्यायमुर्ती किशोरे सी. संत जे. यांनी नुकतेच जुन्या ट्रस्टची मान्यता कायम ठेवण्याचा आदेश दिला आहे. या प्रकरणात ट्रस्टच्या वतीने ॲड. नंदकिशोर गरुड व ड. विवेक ढगे, यांनी कामकाज पाहिले. त्यांना पुणे चॅरिटी कमिशनर येथील ॲड. शिवराज कदम यांनी सहकार्य केले.



वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# जीवनातील मोठ्या यशाचा पाया हा प्राथमिक शिक्षणातच रचला जातो

## आयएएस अधिकारी सौरभ ढाकणे । पाथर्डीत पहिलीच्या वर्गासाठी पायाभूत अभ्यासक्रम प्रशिक्षण

**● पाथर्डी । वीरभूमी –**

केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होण्याने संपूर्ण जिल्हा परिषद शाळांमधील गुरुजनांचा सन्मान झाला आहे. आपल्या यशामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षकांचा मोठा वाटा आहे, जीवनातील मोठ्या यशाचा पाया हा प्राथमिक शिक्षणातच रचला जातो. प्राथमिक शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांचा तो पाया भक्कम करावा. असे गौरवोद्गार केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा नुकतेच उत्तीर्ण झालेले आयएएस अधिकारी तथा तालुक्याचे भूमिपुत्र सौरभ ढाकणे यांनी व्यक्त केले.

येथील श्री तिलोक जैन विद्यालयात राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण संस्थेच्या आदेशानुसार इयत्ता पहिली च्या वर्गासाठी पायाभूत अभ्यासक्रम प्रशिक्षण संपन्न झाले. तीन दिवस चाललेले या शिबिराचा समारोप आज ढाकणे यांच्या उपस्थितीत झाला. तालुक्यातील ३१५ प्राथमिक शिक्षक यांना तालुकास्तरीय प्रशिक्षण देण्यात आले असून सी. बी. एस. सी. पॅटर्ननुसार अभ्यासक्रमाचा प्रारंभ यंदा पहिलीच्या वर्गापासून सुरू करण्यात आला आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य डॉ. अशोक दौंड तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्राचार्य जी. पी. ढाकणे, गटशिक्षणाधिकारी रामनाथ कराड, राजेंद्र ढाकणे, महेंद्र राजगुरू, कल्याण लवांडे, सुनील खेडकर, शिवाजी ढाकणे, याशिवाय एकूण १० सुलभक उपस्थित होते.

यावेळी बोलताना ढाकणे म्हणाले, शिक्षणामध्ये प्रत्येक पायरी महत्त्वाची असून प्रत्येक क्षण स्पर्धात्मक वातावरण निर्मिती करीत असतो. प्राथमिक वर्गातच शिक्षणाची दृष्टी व गोडी निर्माण होत असल्याने हा पाया अधिकाधिक मजबूत कसा होईल, यावरच शैक्षणिक जीवनातील यशाची टक्केवारी अवलंबून असते. प्राप्त परिस्थितीमध्ये खाजगी शाळा अथवा जिल्हा परिषदेच्या शाळा असा कोणताही भेद करणे चुकीचे ठरेल. जिल्हा परिषद शाळांचा दर्जा सुद्धा तेवढ्याच उंचीचा असून अनेक अधिकारी व मोठ्या व्यक्तींची जडणघडण जिल्हा परिषदेतूनच झाली आहे. आपण स्वतः जिल्हा परिषद शाळेत शिकूनच आयएएस झालो. पालकांनी मुलांच्या मनावर आपले मत अथवा विचार न लादता त्यांना विश्वासात घेऊन प्रत्येक गोष्टीचा चांगला व अनिष्ट पदर दाखवून द्यावा. मात्र मुलांचा निर्णय मुलांनाच घेऊ द्यावा. स्पर्धा परीक्षा या फक्त करिअरच्या वाटा आहेत असे अजिबात नाही, तर अनेक पर्याय उपलब्ध आहेत. कुठल्याही गोष्टीत करिअर करता येते. त्यासाठी झोकून देण्याची वृत्ती पालक आणि शिक्षकांकडून विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवली जाते. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने स्पर्धा परीक्षांसाठी याचा मोठा लाभ होणार आहे. देशसेवा, औद्योगिक क्षेत्र, उत्पादन क्षेत्र, सेवा क्षेत्र अशी सर्वच क्षेत्रे आपल्या परीने श्रेष्ठ आहेत. कष्टाला कुठलाही पर्याय नाही, यशाला कुठलाही शॉर्टकट नाही याची खूण गाठ मनाशी पक्की झाली की विद्यार्थी आत्मविश्वास पूर्ण पावले टाकत यशाकडे वाटचाल करतो. ग्रामीण व शहरी असा भेद आता केव्हाच संपुष्टात आला असून सी. बी. एस. सी. पॅटर्न सारखा नवा शैक्षणिक पॅटर्न खेड्यातही उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांच्या मनामध्ये शिक्षकांकडून नव्या पद्धतीने आत्मविश्वास व गोडी निश्चित वाढविली जाईल. त्यासाठी शास्त्रशुद्ध पद्धतीने प्रशिक्षण शिक्षकांना देण्यात आले आहे. जिल्हा परिषद शाळा खऱ्या अर्थाने नव्या शैक्षणिक उपक्रमांचा मानबिंदू ठराव्यात. केवळ अभ्यास म्हणजे शिक्षण नसून व्यक्तिमत्व विकास, खेळ, मूल्य शिक्षण यावर सुद्धा शिक्षकांनी लक्ष द्यावे. काळाची ती गरज आहे. शिक्षणातून संस्कारांचे प्रदर्शन व्हावे अशी समाजाची अपेक्षा असते ती पूर्ण करण्यात प्रशिक्षित शिक्षक उत्साहाने योगदान देतील. असा विश्वास ढाकणे यांनी व्यक्त केला.



यावेळी बोलताना डॉ. दौंड म्हणाले, प्राथमिक शाळांमधूनच विद्यार्थ्यांची जडणघडण सुरू होते. शिक्षकांनी अधिकाधिक सकारात्मक रहावे. सीबीएससी पॅटर्नचे यश एक तपानंतर बारावीच्या यशानंतर समजेल. देशांमध्ये उत्तर भारतचा विशेषतः बिहारचा वरचष्मा प्रशासकीय सेवांमध्ये का दिसतो असा प्रश्न प्रत्येकाला पडतो. यामागे सीबीएससी पॅटर्नचे शिक्षण हेच उत्तर आहे. यासाठी जाणीवपूर्वक काम करण्याची गरज आहे. विद्यार्थी कितीही उच्चशिक्षित झाला तरी दहावीपर्यंत शिकविलेले शिक्षकच त्याच्या आयुष्यभर स्मरणात राहतात. याचे मुख्य कारण भावनिक जिव्हाळा व शिक्षकांविषयी बालमनामध्ये होणारी विश्वासाची भावना हेच राहते. तालुका शिक्षण विभागाने अतिशय शास्त्रशुद्ध पद्धतीने व पूर्ण गांभीर्याने शिक्षकांना दिलेले प्रशिक्षण शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी लाभदायक ठरेल.

या शिबिरातील प्रशिक्षणाविषयीचे अनुभव विविध शिक्षकांनी भाषणातून व्यक्त करत त्याची अंमलबजावणी उद्यापासून सुरू होणाऱ्या नव्या शैक्षणिक वर्षात राज्यभर सर्वत्र होईल.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी रामनाथ कराड, सूत्रसंचालन भाऊसाहेब गोरे यांनी केले तर सुरेश खेडकर यांनी आभार मानले.

यावेळी बाळासाहेब वामन, सुलभक सुनयना शहाणे, अनिता गायकवाड, वैशाली खेडकर, सुभाष सोनवणे, शहादेव नागरे, संदीप राठोड, संदिप मुखेकर, संतोष कुसळकर, आण्णा फलके आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचाच म्हाळुंगी पुलासाठी पाठपुरावा

## सत्ताधाऱ्यांनी म्हाळुंगी पुलाचे काम राजकारणासाठी रखडवले; सोमेश्वर दिवटे यांचा आरोप

**● संगमनेर । वीरभूमी –**

म्हाळुंगी नदीला आलेल्या [पू]रामुळे २०२२ मध्ये साईनगर [क]डे जाणारा पूल खचला होता. [हा] पूल तातडीने व्हावा याकरता [मा]जी मंत्री बाळासाहेब थोरात [यां]नी मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा [क]रून साडेचार कोटी रुपयांचा [नि]धी उपलब्ध करून घेतला होता [मा]त्र राज्यात सत्तांतर झाले आणि [फ]क्त राजकारणासाठी या पूलाचे [का]म सत्ताधाऱ्यांनी रखडवले होते [आ]ता पूल झाल्याने समाधान [अ]सून या पुलाचे सर्व श्रेय माजी [मं]त्री बाळासाहेब थोरात यांचेच [अ]सल्याचे शहराध्यक्ष सोमेश्वर [दि]वटे यांनी म्हटले आहे.

दिवटे यांनी दिलेल्या प्रसिद्धी [प]त्रकार म्हटले आहे की, २०२२ [म]ध्ये म्हाळुंगी नदीला आलेल्या [पु]रामुळे तो पूल घातला होता.

यानंतर माजी मंत्री बाळासाहेब [थो]रात व तत्कालीन नगराध्यक्ष [सौ]. दुर्गाताई तांबे यांनी पुलाची [पा]हणी करून सहकार महर्षी [भ]ाऊसाहेब थोरात सहकारी [सा]खर कारखान्याच्या माध्यमातून नागरिकांच्या सोयीसाठी तात्पुरता पूल उभा केला होता. साईनगर, घोडेकर मळा व गंगामाई घाटाकडे जाणारा पूल भक्कम व्हावा याकरता लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी तत्कालीन मुख्यमंत्री यांच्याकडे पाठपुरावा करून साडेचार कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेतला होता.



मात्र पालकमंत्री व त्यांचे स्थानिक कार्यकर्ते यांनी राजकारण करण्याकरता नगरपालिकेच्या शॉपिंग कॉम्प्लेक्स निधीही या पुलाकरता वळवला आणि अनेक दिवस काम रखडवले. हा पुल तातडीने करावा याकरता नागरिकांची सातत्याने मागणी होती. याचबरोबर म्हाळुंगी नदी पूल कृती समितीने ही आंदोलन केले. तरीही राजकारणाच्या सोयीसाठी हे काम थांबवले होते.

जनतेच्या विकासासाठी राजकारण करायचे असते हा मंत्र लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी सातत्याने जपला आहे. माजी मंत्री थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर हे शहर हायटेक व वैभवशाली असून संगमनेर मध्ये अत्यंत चांगल्या सुविधा नागरिकांना पुरवल्या जात आहे याचबरोबर निळवंडे धरणातून थेट पाईप लाईन योजना असल्याने भर उन्हाळ्यात सुद्धा संगमनेर करांना मुबलक पाणी मिळत होते.

संगमनेर हायटेक बस स्थानक, नगरपालिका, न्यायालय इमारत, प्रांत कार्यालय, तहसील कार्यालय, पंचायत समिती, शासकीय विश्रामगृह, कवी अनंत फंदी खुले नाट्यगृह, याचबरोबर प्रवरा नदीवर चार पूल आणि बायपास अशा मोठ्या विकासाच्या योजना राबवल्या आहेत संगमनेर शहर हे स्वच्छ व सुंदर शहर असून नगरपालिकेला याबाबत राज्य व राष्ट्रीय स्तरावर अनेक पुरस्कार मिळाले हिरवाईचे सुरक्षित शहर म्हणून संगमनेरची राज्यात ओळख निर्माण झाली आहे.

साईनगर परिसरातील नागरिकांना व विद्यार्थ्यांना सोयी करता माळुंगी पूल लवकरात लवकर व्हावा याकरता माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी पाठपुरावा सुरूच ठेवला होता. पूल सुरू झाल्याने आनंद असून या पूल उभारणीचे श्रेय हे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचेच असल्याचे सोमेश्वर दिवटे यांनी म्हटले आहे.

या परिसरातील स्थानिक नागरिकांनी या पुलाच्या कामासाठी पाठपुरावा केल्याबद्दल माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे व आमदार सत्यजित तांबे यांचे अभिनंदन केले आहे.

# चाळीशीनंतर महिलांचे आरोग्य! या विषयावर व्याख्यानास उत्स्फूर्त प्रतिसाद

**● अ. नगर । वीरभूमी –**

प्रयास व नम्रता दादी–नानी ग्रुपच्या वतीने आयोजित चाळीशीनंतर महिलांचे आरोग्य या विषयावरील मार्गदर्शनपर व्याख्यानास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. महिलांच्या आरोग्याबरोबरच त्यांच्या मानसिक स्वास्थ्य, नेत्रसंबंधी काळजी, तसेच मनोरंजनात्मक आणि बौद्धिक विकासासाठीही या कार्यक्रमात विविध उपक्रम राबविण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. जगदीश भराडिया, डॉ. नेहा भराडिया, सुनिता भगवान फुलसौंदर, एकता कदम, उद्योजक कृष्णा जाधव, विशाल कुटे, दादी–नानी ग्रुपच्या अध्यक्षा जयाताई गायकवाड, प्रयास ग्रुपच्या संस्थापिका अलकाताई मुंदडा, अध्यक्षा रजनी भंडारी, उपाध्यक्ष उषा सोनी, सल्लागार विद्या बडवे, सचिव ज्योती कानडे, रेखा फिरोदिया, मेघना मुनोत, उज्वला बोगावत, सोनी पुरनाळे, अर्चना बोरुडे, हिरा शहापुरे, उषा सोनटक्के, अरुणा गोयल, शकुंतला जाधव, वंदना गारुडकर, शशिकला झरेकर, अलका वाघ, सुजाता कदम, सुनिता काळे, आशा गायकवाड, लीला अग्रवाल, सुरेखा जंगम, ज्योती गांधी, जयश्री पुरोहित, सुजाता पुजारी, रेखा मैड, हेमा पडोळे, आरती थोरात आदी उपस्थित होत्या.

डॉ. जगदीश भराडिया यांनी महिलांच्या आरोग्याविषयी सखोल मार्गदर्शन करताना सांगितले की, स्त्री ही सृजनाची मूळ शक्ती असून तिच्या आरोग्यावर संपूर्ण कुटुंबाच्या स्वास्थ्याचे भवितव्य अवलंबून असते. बदलती जीवनशैली, वाढता तणाव, आहारातील बिघाड यामुळे महिलांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहेत. त्यामुळे महिलांनी स्वतःच्या आरोग्याकडे गांभीर्याने लक्ष देण्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्याचबरोबर डॉ. नेहा भराडिया यांनी डोळ्यांचे आरोग्य महत्त्वाचे असल्याचे सांगत मोतीबिंदूसारख्या आजारांची माहिती दिली. वय वाढल्यावर डोळ्यांची नियमित तपासणी करून योग्य वेळी उपचार घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रास्ताविक करताना अलका मुंदडा यांनी प्रयास ग्रुपच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून महिला सक्षमीकरण आणि आरोग्य जनजागृतीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी महिलांसाठी विविध बौद्धिक आणि मनोरंजनात्मक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. महिलांनी विविध खेळांचा आनंद लुटला. विजेत्या महिलांना उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते बक्षीसे देण्यात आली. मेघना मुनोत यांनी विविध खेळ घेतले. कुंश मसाले यांच्या वतीने महिलांना मोफत मसाले वितरित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरी जोशी यांनी केले. आभार ज्योती कानडे यांनी मानले.

# कोरेगाव विजयस्तंभाच्या रक्षणासाठी जागरुकता निर्माणासाठी महिलांचे संघटन

## कापूरवाडी येथे कोरेगाव जयस्तंभ बचाव समितीची बैठक

**● अ. नगर । वीरभूमी –**

कोरेगाव विजयस्तंभाच्या रक्षणासाठी सुरू असलेल्या सामाजिक आणि न्यायालयीन लढ्यास बळकटी देण्यासाठी, कापूरवाडी येथे महिलांचे संघटन करण्याच्या उद्देशाने कोरेगाव विजयस्तंभ बचाव समितीची बैठक पार पडली. या बैठकीच्या माध्यमातून महिलांमध्ये जागरूकता निर्माण करत त्यांच्या सहभागासाठी संघटनेची हाक देण्यात आली.

या बैठकीचे आयोजन समितीच्या अहिल्यानगर महिला अध्यक्षा संगीता घोडके यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते. प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्रिशरण पंचशील घेऊन बैठकीची सुरुवात झाली. यावेळी कोरेगाव भीमा जयस्तंभ बचाव समितीचे प्रदेश संघटक व दक्षिण जिल्हा प्रभारी अध्यक्ष दीपक अमृत, कापूरवाडीच्या सरपंच जनाताई दुसुंगे, शाळा व्यवस्थापन समितीच्या जयश्री दुसुंगे, पंचायत समितीच्या सदस्या सुनिताताई भिंगारदिवे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

महिला अध्यक्षा संगीता घोडके यांनी आपल्या भाषणात, विजयस्तंभ म्हणजे स्वाभिमानाचे प्रतीक आहे. गेल्या अनेक वर्षांपासून दादाभाऊ अभंग या स्तंभाच्या रक्षणासाठी न्यायालयीन लढा लढत आहेत. हा लढा सर्वांचा असून महिलांनी संघटित होऊन या संघर्षाला बळ देणे आवश्यक आहे. आपल्या एकतेतच शक्ती आहे, आणि महिलांच्या सक्रिय सहभागातूनच विजय निश्चित होईल, असे ठामपणे त्यांनी सांगितले.

दीपक अमृत यांनी जयस्तंभ रक्षणासाठी सुरू असलेल्या लढ्याचा आढावा घेत महिलांना शाहू–फुले–आंबेडकरी चळवळीचा इतिहास सांगितला. त्यांनी असेही सांगितले की, हा विजयस्तंभ म्हणजे केवळ ऐतिहासिक स्मारक नाही, तर बहुजन समाजाच्या संघर्षाचे प्रतीक आहे. महिलांचा सहभाग या चळवळीत निर्णायक ठरेल.

सरपंच जनाताई दुसुंगे यांनी स्त्रिया जर एकवटल्या, तर कोणतीही चळवळ यशस्वी होऊ शकते. विजयस्तंभ रक्षणासाठी आपण सर्वांनी कटीबद्ध राहण्याचे त्यांनी आवाहन केले. जयश्री दुसुंगे यांनी महिला संघटन विषयी मार्गदर्शन केले.



या बैठकीला गावातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यामध्ये वंदना कांबळे, रोहिणी कांबळे, ज्योती पाटोळे, मंगल भिंगारदिवे, सुप्रिया भिंगारदिवे, ऋतुजा भिंगारदिवे, जयश्री साळवे, सरुबाई शिंगारे, मीरा ठोंबे, पुष्पा भिंगारदिवे, प्रतिभा भिंगारदिवे, मनीषा जाधव, लंका पाडळे, रुक्सार शेख, सुनीताताई भिंगारदिवे, बेबीताई भिंगारदिवे, संगिता भिंगारदिवे, लंका भिंगारदिवे, वर्षा भिंगारदिवे, लहानुबाई अरुणे, सारिका भिंगारदिवे, लता भिंगारदिवे, रहीबाई साळवे, प्रीती भिंगारदिवे, कावेरी भिंगारदिवे, सुरेखा भिंगारदिवे, वैशाली भिंगारदिवे, शोभा भिंगारदिवे, कल्पना भिंगारदिवे, बबली भिंगारदिवे, कीर्ती उमाप, शिरीन सय्यद, भिमाबाई दुसंगे, रेणुका शिंदे, प्रियंका पाडळे, दिक्षा घोडके, जयश्री पाडळे, मनीषा पाडळे, राहुल अमृत आदींचा समावेश होता. गावातील महिलांनी एकजुटीने या बैठकीत सहभाग नोंदवून संघटनशक्तीचे दर्शन घडवले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता भिंगारदिवे यांनी केले. आभार रोहिणी कांबळे यांनी मानले.